मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहिरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवडमध्ये 'विकसित भारत संकल्प यात्रेस' नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद

## पिंपरी चिंचवड शहरात २८ नोव्हेंबर पासून ही यात्रा झाली सुरू

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
विकसित भारत संकल्प यात्रेला पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत ३२ हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी या यात्रेला भेट देऊन विविध योजनांचा लाभ घेतला आहे. यामध्ये महिलांचे प्रमाण अधिक असून या उपक्रमाबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. भारत सरकारच्या विविध महत्वाकांक्षी योजनांचा लाभ वंचित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी भारत सरकारने 'विकसित भारत संकल्प यात्रा' ही मोहीम संपुर्ण देशभर सुरू केली.



पिंपरी चिंचवड शहरात २८ नोव्हेंबर पासून ही यात्रा सुरू झाली. आतापर्यंत शहरातील ५९ ठिकाणी या यात्रेने भेट दिली असून नागरिकांना विविध लाभांचे वाटप केले आहे. यात्रेच्या वाहनाद्वारे नागरिकांना देण्यात येणाऱ्या लाभांमध्ये प्रधानमंत्री पथ विक्रेता आत्मनिर्भर निधी योजना, आयुष्मान भारत कार्ड, आधार कार्ड अद्यावतीकरण, उज्वला गॅस योजना अशा विविध योजनांचा समावेश असून लाभ देण्यासोबत महापालिकेच्या वतीने आरोग्य शिबीरांचेही आयोजन केले जात आहे. थेरगाव येथील डांगे चौक या ठिकाणी पार पडलेल्या विकसित भारत संकल्प यात्रेच्या कार्यक्रमास खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे, वृक्ष प्राधिकरण समितीचे माजी सदस्य सिद्धेश्वर बारणे तसेच विविध सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी आत्मनिर्भर भारतासाठी पंचप्रण शपथ घेतली. शहरात २८ डिसेंबर रोजी कासारवाडी येथील विसावा हॉटेल चौक येथे सकाळी १० वाजता, नवी सांगवी येथील काळूराम जगताप बॅडमिंटन हॉल येथे दुपारी ३ वाजता तर २९ डिसेंबर रोजी नटसम्राट निळु फूले सभागृह येथे सकाळी १० वाजता, जुनी सांगवी येथील पी.डब्ल्यु.डी मैदान येथे दुपारी ३ वाजता ही यात्रा भेट देणार आहे. शेवटच्या दिवशी म्हणजे ३० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता गजानन महाराज मार्केट या ठिकाणी ही यात्रा भेट देणार आहे. नागरिकांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या विविध कक्षांना भेट द्यावी तसेच विविध योजनांची माहिती घेऊन लाभ घ्यावा असे सांगून अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांनी आरोग्य विभागाच्या वतीने आरोग्य शिबीराचेही आयोजन या यात्रेत करण्यात येत असून विविध आरोग्यविषयक तपासण्याही नागरिकांनी करून घ्याव्यात असे आवाहन केले.

# देशात महागाई, बेरोजगारीने नागरिक त्रस्त : डॉ. कदम

## देशाला पुढे जाण्यासाठी आता काँग्रेस पक्ष योग्य पर्याय

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
देशातील नागरिक महागाई, बेरोजगारीमुळे त्रस्त झाले आहेत. केंद्र आणि राज्य सरकार जातीजातीमध्ये तेड निर्माण करण्याचे काम करीत आहे. देशाला पुढे जाण्यासाठी आता काँग्रेस पक्ष योग्य पर्याय आहे. काँग्रेसच्या १३९ व्या वर्धापन दिनानिमित्त नागपूर येथे आयोजित केलेल्या है



तैयार हम या मेळाव्यास राज्यातील लाखो नागरिक उपस्थित राहत आहेत या साठी पिंपरी चिंचवड मधून काँग्रेसचे सुमारे दीडशे पदाधिकारी आणि कार्यकर्ते बुधवारी रवाना होत आहेत अशी माहिती पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी दिली.

पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून बुधवारी काँग्रेसचे कार्यकर्ते शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली नागपूरला रवाना झाले आहेत. यामध्ये विश्वनाथ जगताप, विठ्ठल शिंदे, ज्ञानेश्वर मलशेट्टी, विजय ओव्हाळ, डॉ. मनिषा गरूड, भाऊसाहेब मुगुटम, बाळासाहेब बनसोडे, गौतम ओव्हाळ, मिलिंद फडतरे सुधाकर कुंभार, युनुस बागवान, निखिल भोईर, सतीश भोसले, इरफान पठाण, राजू ठोकळ, सुधाकर कुंभार, हरीश डोळस, आकाश शिंदे, जितेंद्र छाबडा, फिरोज तांबोळी, सौरभ शिंदे, प्रा. किरण खाजेकर, विशाल कसबे, ॲड. बाजीराव दळवी, शयान अन्सारी, सुरज गायकवाड, अमरजीत सिंग, चंदन गुप्ता, जय राऊत, शहाजात शेख, श्रीराम लवंगे, कैलास मकासरे, निर्मलाताई खैरे, शशिकांत जगताप, प्रकाश लोंढे, दिलीप जगताप, चिदानंद जमादार, बाबासाहेब वाघमारे, गौरीताई शेलार, अरुण डोळस, आशा डोळस, प्रमोद शेलार, लक्ष्मीबाई जठार आदींचा समावेश आहे.

# संतांचे विचार हाच आपला आधार

## हभप सोपान महाराज सानप यांचे मत

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** संतांचे विचार हाच आपला आधार आहेत, तेच आपल्या जीवनाला आकार देतात. दत्तजयंतीच्या निमित्ताने आपण सर्वांनी अंतर्मुख झाले पाहिजे. संतचरित्र वाचले पाहिजे. आपल्या मुलांना शिक्षणाबरोबर संस्कृतीचे धडे दिले पाहिजेत. गुरु आपल्याला सातत्याने मार्गदर्शन करतात, तर सद्गुरू जीवनाचा मार्ग दाखवतात. संसार होत असतो. परमार्थ करावा लागतो. अलिकडच्या पिढीने वडीलधाऱ्या मंडळींचा मान ठेवावा. संतवचनाचे संस्कार मनुष्य जीवनाला आकार देतात. असे मत हभप सोपान महाराज सानप यांनी व्यक्त केले. ते विश्वचैतन्य सद्गुरू नारायण महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली वाल्हेकरवाडी, सायली कॉम्प्लेक्स येथे गुरुदत्त मित्र मंडळाच्या वतीने आयोजित दत्तजयंती सोहळ्यात बोलत होते. कार्यक्रमास पिंपरी चिंचवड भाजपा अध्यक्ष शंकर जगताप, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, प्रेरणा बँकेचे चेअरमन कांतीलाल गुजर, मंडळाचे अध्यक्ष चंद्रहास वाल्हेकर, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती नाना शिवले, अक्कलकोटचे सरपंच रमेश पाटील, संत तुकाराम कारखान्याचे माजी संचालक तानाजी भोंडवे, मंडळाचे आधारस्तंभ राजाराम वाल्हेकर, ज्ञानेश्वर वाल्हेकर, प्रविण वाल्हेकर, माजी पक्षनेते नामदेव ढाके, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, गणेश भोंडवे, संगीता भोंडवे, शेखर चिंचवडे, आतिश वाल्हेकर, अमोल वाल्हेकर, प्रशांत वाल्हेकर, शुभम वाल्हेकर, तुषार वाल्हेकर, मिलिंद वाल्हेकर आदि मान्यवर उपस्थित होते.



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कोंडीबा शिवले व राजाराम वाल्हेकर यांच्या हस्ते दत्तप्रभुंची आरती संपन्न झाली.

मंडळाचे अध्यक्ष चंद्रहास वाल्हेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. सुप्रसिद्ध गायक तुषार केळकर आणि सहकाऱ्यांनी संतवाणी सादर केली. वारकरी ,दत्तभक्त, महिला, आबालवृद्ध यांनी हरिपाठ, दिंडी सोहळा, कीर्तनसेवा यात सहभाग घेतला. परिसरातील भजनी मंडळींनी सादर केलेल्या भजनमालिकेने वातावरण भक्तिमय झाले होते. प्रविण वाल्हेकर यांनी आभार मानले. हभप रामलिंग मोहिते, अर्जुन जाधव, शिवाजी हरकळ, उद्धव कोळपकर, सुनील काळे यांनी विशेष सहकार्य केले.

# एमबीएच्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतली मेट्रोची कार्यपद्धती

## एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी पीसीएमसी मेट्रो स्टेशनचा पाहणी दौरा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि, पुणे मेट्रो आणि पीसीईटीज् एस.बी. पाटील इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी पीसीएमसी मेट्रो स्टेशनचा पाहणी दौरा आणि मेट्रो प्रवास आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. २५० पेक्षा विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक या अनोख्या मेट्रो दौऱ्यात सहभागी झाले. यावेळी महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.चे डीजीएम एमएमआय अँड टीपी मा. टी. मनोज कुमार डॅनिएल,मा. संचालिका डॉ. कीर्ती सुधाकर धारवाडकर, मा. सहाय्यक प्राध्यापक डॉ. अनिलकुमार कारिया,डॉ. काजल माहेश्वरी उपस्थित होते. पीसीईटीज् एस.बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये शिक्षण घेत असलेल्या एमबीएच्या विद्यार्थ्यांकरिता या मेट्रो दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी पीसीएमसी स्टेशन ते सिव्हील कोर्ट स्टेशन असा मेट्रो प्रवास केला. विद्यार्थ्यांनी मेट्रो स्थानकांची कार्यप्रणाली समजून घ्यावी तसेच त्यांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे महत्त्व समजावे यासाठी या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. मेट्रो प्रवासामध्ये विद्यार्थ्यांना वाढते प्रदूषण, त्यातून निर्माण झालेली आव्हाने आणि त्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे महत्त्व सांगण्यात आले. या प्रसंगी पुणे मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी मेट्रोविषयी अभ्यागतांना माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच त्यांच्या सूचनांची नोंद घेतली. पीसीएमसी स्मार्ट सारथी टीमने या कार्यक्रमाचा प्रचार-प्रसार आणि समन्वय साधण्याची भूमिका निभावली.



# कोल्हेंचा पराभव करणं सोपं नाही

## तुम्ही आव्हान दिलं पण त्यात दुरुस्ती होईल : जयंत पाटील

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांचा पराभव करणं सोपं नाही, अमोल कोल्हे यांनी लोकसभेत सर्वाधिक प्रभावी पद्धतीने प्रश्नांची मांडणी केली आहे असं राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी म्हटलं. अमोल कोल्हे यांना त्यांच्या लोकसभा मतदारसंघात अधिक प्रोत्साहन द्याल असा मला विश्वास आहे. काहींनी अमोल कोल्हे यांना आव्हान दिलं, तुम्ही आव्हान देता पण यात दुरुस्ती व्हायला हवी अशी अपेक्षा आहे असंही ते म्हणाले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते. जयंत पाटील म्हणाले की, ''आज काही लोकं अमोल कोल्हे यांना पराभव करायचा प्रयत्न करत आहेत. ज्या व्यक्तीने शिवाजी महाराजांना घरापर्यंत पोहचवले त्यांना पराभूत करणे सोपे नाही. संभाजी महाराज, शिवाजी महाराज यांची खरी



ओळख कोल्हेंनी जनतेला करून दिली. तसेच आण्णाजी पंत कोण आहे याची ओळख करण्याचे कामही त्यांनी केलं. अमोल कोल्हे तुम्ही या लोकसभा मतदारसंघांमध्ये फिरा, पण मला तुम्हाला महाराष्ट्रात घेऊन फिरायचे आहे. शिवस्वराज्य यात्रेची कल्पना मी अमोल कोल्हे यांना दिली होती, तेव्हा अमोल मिटकरी देखील आमच्या बरोबर असायचे. त्यावेळी आम्ही ५४ आमदार निवडून आणले.'' अमोल कोल्हे यांचे अभिनंदन यासाठी की देशातील आणि राज्यातील अनेक खासदार कदाचित वेगळे प्रश्न मांडत असतील, पण सगळ्यात प्रभावी मांडणी कोणी लोकसभेत केली असेल तर अमोल कोल्हे यांनी केलं. नुसतं युट्यूबवर अमोल कोल्हे आणि त्यांची लोकसभेतील भाषण ऐका मग समजेल. अमोल कोल्हे हा मोर्चा घेऊन सगळ्यांच्या समोर अनेक प्रश्न घेऊन आले आहेत. मला वाटलं होतं की संसदेतील खासदार असा शेतकरी आक्रोश मोर्चा काढतोय की राज्यातील नेत्यांनी त्यांची दखल घ्यावी. या मोर्चे ला कमी लेखण्याचा काम करण्यापेक्षा आम्ही सगळ्या प्रश्नांना न्याय देऊ असे सांगायला पाहिजे होते. आज मला खंत वाटते की दिलीप मोहिते यांनी आमचे व्यासपीठ सोडले आहे आणि मला मनापासून दुःख वाटतं. माणसाच्या आयुष्यात काही प्रसंग येत असतात की ठामपणे भूमिका घेऊ शकतो. कसं काय राव कसं केलं तुम्ही? मी काही लोकांना विचारलं तर लोकं म्हणतात सध्या सगळीकडे दहशत आहे. शिवसेना, काँग्रेस आणि पवार साहेबांची राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत परत येईल असे तरुण म्हणतात. सी व्होटरने सर्व्हे केला आहे, महाविकास आघाडीचा आकडा सध्या २९ आहे. ज्यावेळी वज्रमूठ सभा सुरू होतील आणि जेव्हा आमचे नेते सभेसाठी एकत्र येतील तेव्हा महाराष्ट्र ढवळून निघेल आणि जनमत काय आहे ते स्पष्ट होईल. कुठल्या ही नेत्याला कांदा निर्यातीसंदर्भात बोलता येत नाही. पण आपण दिल्लीच्या तक्तासमोर झुकायचे नाही. शरद पवार आक्रमकतेने नाहीतर सौम्यातेने सगळ्या गोष्टी करत आहेत. हळूहळू या सगळ्या परिस्थितीवर मात करण्याची मानसिकता ८४ वर्षाच्या व्यक्तीत दिसते. एकसंघाने दोन्ही निवडणुका झाल्या तर मोठ्या प्रमाणात आपण निवडणुका जिंकू. पवार साहेबांच्या, उद्धव ठाकरे आणि इंडियाच्या मागे उभे रहा. बाबरी मशीदीच्या पतनावेळी बाळासाहेब ठाकरे यांनी जबाबदारी घेतली होती, पण भाजपमधील कोणी पुढे आलं नव्हतं.

### कलश यात्रा ही राजकीय नसावी

**» जानेवारी महिना हा रामाचा महिना म्हणून सोडून द्या रामाचे गुण हे सगळे पाळण्याचं काम आमची महाविकास आघाडी करेल. राम हा भारत भूमीचा देव आहे. सगळ्यांना आता अक्षता देण्यात येतील. कलश यात्रा ही राजकीय नसावी. जानेवारी हा महिना रामाचा महिना म्हणून तुम्ही सोडून द्या. कारण सत्तेतील लोकांना प्रश्न विचारले तर ते या महिन्यात सोडविणार नाहीत. रामाला कब्जात घेण्यासाठी सरकार जानेवारी महिन्यात सुट्टीवर गेले आहे. काहींनी अमोल कोल्हे यांना आव्हान दिलं, तुम्ही आव्हान देता पण यात दुरुस्ती व्हायला हवी अशी अपेक्षा आहे असंही ते म्हणाले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते. जयंत पाटील म्हणाले की, ''आज काही लोकं अमोल कोल्हे यांना पराभव करायचा प्रयत्न करत आहेत. अमोल कोल्हे यांचा पराभव करणं सोपं नाही**

# अजित पवार पालकमंत्री झाल्यानंतर निधी मिळाला नाही

## भाजप आणि शिंदे गटाच्या जिल्हा नियोजन समितीनी केला आरोप

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** अजित पवार पुण्याचे पालकमंत्री झाल्यानंतर आपल्याला विकासनिधी मिळत नसल्याचा आरोप पुणे जिल्ह्यातील भाजप आणि एकनाथ शिंदे गटाच्या जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांनी केलाय. भाजप आणि शिंदे गटाच्या या नेत्यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्याकडे अजित पवारांची तक्रार केलीय आणि तसे निवेदन दिलेय. अजित पवारांच्या आधी चंद्रकांत पाटील पुण्याचे पालकमंत्री असताना त्यांनी मंजूर केलेल्या विकास कामांचा निधी अजित पवारांनी अडवून धरल्याचा या सदस्यांचा आरोप हा ८०० कोटी रुपयांचा निधी तात्काळ रद्द करण्यात यावा, अन्यथा न्यायालयात जाऊ असा इशारा भाजप आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी दिला आहे. आशा बुचके , विजय फुगे, आनंदा नंदे , वासुदेव काळे, कांचन अलंकार , शरद बुट्टे पाटील, प्रवीण काळभोर , पांडुरंग कचरे, अमोल पांगारे, जीवन कोंडे या भाजप आणि शिंदे गटाच्या सदस्यांनी अजित पवारांविरुद्ध तक्रार केलीय. १९ मे २०२३ रोजी पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली होती. सदर बैठकीला जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, आमदार, खासदार यांचेसह राज्याचे विरोधी पक्षनेते तसेच राज्याचे माजी मुख्यमंत्री व देशाचे माजी मंत्री शरद पवार साहेब व सदस्य सचिव म्हणून आपण उपस्थित होता. अधिकारी या बैठकीत जिल्हा नियोजन समितीच्या विषयवार कामकाजासोबत जिल्ह्यातील अनेक प्रश्नावर चर्चा झाली आणि पालकमंत्री महोदयांनी त्याबाबत योग्य त्या सूचना सर्व संबंधितांना दिल्या. तसेच सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी आणि जिल्हा नियोजन समितीचे सदस्य यांनी सुचविलेल्या जिल्हा वार्षिक योजना आराखडा २०२३-२४ मधील विकासकामांना मान्यता देण्याचे निश्चित झाले होते. याबाबत पालकमंत्र्यांनी सर्वांची विकास कामे समाविष्ट करून या याद्यांचे एकत्रिकरण करून अंतिम याद्या इतिवृत्तासोबत सदर करणे बाबत सूचित केले होते व तशी कार्यपद्धती अमलात असल्याचे आपणास माहित आहे. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी व जिल्हा नियोजन समिती सदस्य यांनी मागणी केलेली व निश्चित केलेली सर्व विकास कामे (जिल्हा परिषदेकडील योजना) एकत्रित करून ३ जुलै असे असतानाही आपल्या स्तरावरून या बैठकीचे इतिवृतांत आज २६ डिसेंबर २०२३ पर्यंत म्हणजेच गेली ७ महिने झाले तरी अंतिम करून तत्कालीन पालकमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीसह आम्हा सदस्यांना प्राप्त झालेले नाही, त्यामुळे या बैठकीत मंजूर झालेल्या विकासकामांवर परिणाम झाला.

# होर्डिंग नूतनीकरणाचा नाही तर काढून टाकण्याचा प्रस्ताव पाठवा

## अतिरिक्त आयुक्तांचे क्षेत्रीय कार्यालयास आदेश

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** संभाजी पोलिस चौकीच्या मागील नियमबाह्य होर्डिंग अधिकृत करण्यासाठी कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाकडून खटाटोप सुरु आहे. मात्र, आता हे होर्डिंग अधिकृत करण्याचा प्रस्ताव न पाठवता, थेट काढून टाकण्याचाच प्रस्ताव पाठवा असे आदेश अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी दिले आहेत. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाला अखेर कारवाई करावी लागणार आहे.




टिळक चौकात संभाजी पोलिस चौकीच्या मागे तीन होर्डिंग उभारण्यात आले आहेत. हे होर्डिंग उभे करताना दोन होर्डिंगमध्ये प्रत्येकी एक मीटरचे अंतर न सोडणे, झाडे तोडणे, राडारोडा टाकून नियमांचे उल्लंघन केले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात मोक्याच्या ठिकाणी हा प्रकार सुरु असल्याचे लक्षात आल्यानंतर ऑगस्ट महिन्यात होर्डिंगच्या कामाला स्थगिती देण्यात आली. तसेच जाहिरात प्रसिद्धीवर बंदी आणली आहे. हे होर्डिंग उभारताना प्रत्यक्षात जागेवर काय स्थिती आहे याकडे दुर्लक्ष केल्याने कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांना निलंबित ही करण्यात आले होते. या होर्डिंगचा परवाना रद्द केला, त्यानंतर २० बाय १०० फूट असा महाकाय लोखंडी सांगडा महापालिकेने काढणे अपेक्षीत होते. पण गेल्या चार महिन्यात काढून टाकले नाही. होर्डिंग व्यावसायिकाने ही जागा खासगी मालकीची असल्याचा दावा केला होता, पण अधिकाऱ्यांनी केलेल्या जागा पाहणीत ही जागा महापालिकेची असल्याचे समोर आले आहे. तरीही क्षेत्रीय कार्यालयाकडून संबंधित होर्डिंग व्यावसायिकास ११ महिने मुदतीने जागा भाड्याने देण्याचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्याची हालचाल सुरु करण्यात आली आहे. यासंदर्भात 'सकाळ'ने वृत्त प्रकाशित करून हा प्रकार चव्हाट्यावर आणला होता. त्यानंतर आता प्रशासनाने भूमिका बदलत हे होर्डिंग काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार म्हणाले, ''संभाजी पोलिस चौकीच्या मागील होर्डिंग हे महापालिकेच्या जागेत आहे. ही जागा होर्डिंगसाठी द्यावी असा प्रस्ताव न पाठवता होर्डिंग काढून टाकण्याचा प्रस्ताव पाठविण्याचे आदेश कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयाला दिले आहेत. ही जागा भाड्याने देण्यासंदर्भात त्यानंतर विचार केला जाईल.''

### जाहिरात प्रसिद्धीवर बंदी

» टिळक चौकात संभाजी पोलिस चौकीच्या मागे तीन होर्डिंग उभारण्यात आले आहेत. हे होर्डिंग उभे करताना दोन होर्डिंगमध्ये प्रत्येकी एक मीटरचे अंतर न सोडणे, झाडे तोडणे, राडारोडा टाकून नियमांचे उल्लंघन केले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात मोक्याच्या ठिकाणी हा प्रकार सुरु असल्याचे लक्षात आल्यानंतर ऑगस्ट महिन्यात होर्डिंगच्या कामाला स्थगिती देण्यात आली. तसेच जाहिरात प्रसिद्धीवर बंदी आणली आहे. हे होर्डिंग उभारताना प्रत्यक्षात जागेवर काय स्थिती आहे याकडे दुर्लक्ष केल्याने कसबा विश्रामबाग क्षेत्रीय कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांना निलंबित ही करण्यात आले होते.

# पुणे-मुंबई रेल्वेला तासाभराचा लेटमार्क!

## ओव्हरहेड वायर बिघाडामुळे उशीर अन् प्रवासी वाऱ्यावर

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या नागरिकांच्या प्रवासात बुधवारी तांत्रिक बिघाडाचे विघ्न आले. तळेगावनजीक ओव्हरहेड वायरमध्ये बिघाड झाल्याने डेक्कन क्वीनसह इतर गाड्या सकाळी तासाभरासह अधिक काळ थांबविण्यात आल्या. याबाबत प्रवाशांना कोणतीही सूचना न देण्यात आल्याने गोंधळ उडाला. बिघाड दुरूस्त झाल्याने अखेर गाड्या पुढे मुंबईकडे मार्गस्थ झाल्या परंतु, या संपूर्ण प्रकाराबद्दल प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली. पुणे-मुंबई मार्गावर भेगडेवाडी ते तळेगाव या स्थानकांदरम्यान ओव्हरहेड वायरमध्ये



बिघाड झाला. यामुळे सकाळी पावणेआठपासून मुंबईकडे जाणाऱ्या गाड्या तळेगावजनीक थांबवून ठेवण्यास सुरूवात झाली. यात पुणे-मुंबई नियमित प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांच्या पसंतीची डेक्कन क्वीन सर्वप्रथम अडकली. त्यानंतर पुणे-मुंबई प्रगती एक्स्प्रेस, सिंकदराबाद -मुंबई दुरांतो एक्स्प्रेस आणि पुणे लोणावळा लोकल या गाड्या अडकल्या. या गाड्यांमधील प्रवाशांना त्या थांबविण्याबाबत कोणतीही सूचना रेल्वेकडून देण्यात आली नाही. त्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळ वाढला. नेमकी परिस्थिती समजत नसल्याने अनेक प्रवाशांनी समाजमाध्यमावर याबाबत रेल्वे प्रशासनाला विचारणा केली. त्यावरही रेल्वे प्रशासनाने संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात आले असून, तातडीने कार्यवाही केली जाईल, असे थातुरमातुर उत्तर प्रवाशांना समाजमाध्यमावर दिले.